# भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना

**भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना** राज्यातील अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी सुरु करण्यात आलेली उपयुक्त अशी एक योजना आहे. या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या भत्ता स्वरूपात आर्थिक सहाय्य दिले जाते.

## भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेचे वैशिष्ट्य

- विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी विविध भत्ते स्वरूपात आर्थिक सहाय्य देण्याच्या उद्देशाने सुरु करण्यात आलेली महत्वपूर्ण अशी हि योजना आहे.
- विद्यार्थी घरी बसून स्वतःच्या मोबाईल च्या सहाय्याने या योजनेसाठी अर्ज करून लाभ मिळवू शकतो त्यामुळे त्याला कुठल्याच शासकीय कार्यालयाच्या फेऱ्या मारण्याची आवश्यकता भासणार

## भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेचे उद्देश

- या योजनेचा मुख्य उद्देश अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे जेणेकरून विद्यार्थी कुठल्याच आर्थिक अडचणी शिवाय ते स्वतःचे शिक्षण पूर्ण करू शकतील.
- विद्यार्थ्यांना भत्ते स्वरूपात आर्थिक सहाय्य देणे.
- विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे तसेच त्यांच्यात शिक्षणाबद्दल रुची निर्माण करणे
- शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण कमी करणे.
- विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात जाण्याची संधी देणे.

## भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेचे लाभार्थी

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीमधील विद्यार्थी भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेछे लाभार्थी आहेत.

## भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेचा फायदा

- या योजनेअंतर्गत विद्यार्थी स्वतःचे शिक्षण पूर्ण करू शकतील.
- योजनेच्या सहाय्याने विद्यार्थी स्वतःचे शिक्षण पूर्ण करून स्वतःसाठी एखादी चांगली नोकरी मिळवू शकतील.
- राज्यात साक्षरतेचे प्रमाण वाढेल.
- राज्यात कोणताही विद्यार्थी स्वतःचे शिक्षण पूर्ण करण्यापासून वंचित राहणार नाही.
- विद्यार्थ्यांना स्वतःचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी पैशांसाठी कोणावर अवलंबून राहण्याची गरज भासणार नाही तसेच कोणाकडून पैसे कर्ज घेण्याची देखील आवश्यकता भासणार नाही.
- विद्यार्थी स्वतःचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहित होतील.
- विद्यार्थ्यांची शिक्षणाविषयी आवड निर्माण होईल.

## भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत देय असलेले शिष्यवृत्तीचे लाभ

भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नमूद केल्या प्रमाणे देय असलेल्या शिष्यवृत्तीचे लाभ पात्र विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमनिहाय दिले जातील.

- वसतिगृहात राहणाऱ्या व डे स्कॉलर असणार्या विद्यार्थ्यांना वर्ग निहाय निर्वाह भत्ता मिळेल.

**MAHADBT प्रणाली द्वारे अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत खालील नमूद केलेल्या १६ बाबींसाठी इतर शुल्क मिळेल :**

- प्रवेश फी ( अनुदानित / विनानुदानित)
- ग्रंथालय शुल्क
- विविध गुणदर्शन/ इतर उपक्रम शुल्क
- संगणक प्रशिक्षण शुल्क
- विद्यापीठ विकास निधी
- विद्यापीठ अश्वमेध निधी
- विद्यापीठ विद्यार्थी सहाय्य निधी
- विद्यापीठ विद्यार्थी विमा निधी
- युथ फेस्टिवल निधी
- प्रयोगशाळा शुल्क
- जिमखाना शुल्क
- महाविद्यालय मासिक (magazine) शुल्क
- नोंदणी शुल्क
- विद्यापीठ क्रीडा निधी
- विद्यापीठ वैद्यकीय मदत निधी
- विद्यार्थी ओळखपत्र शुल्क

## भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत आवश्यक पात्रता व अटी

- अर्जदार विद्यार्थी हा महाराष्ट्र राज्याचा मूळ रहिवाशी असणे आवश्यक आहे.
- फक्त महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांनाच भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत लाभ दिला जाईल.
- अर्जदार विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न 2.5 लाखापेक्षा जास्त असता कामा नये.
- अर्जदार विद्यार्थी किमान इयत्ता 10 वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
- 2 वर्षांच्या ड्रॉपसाठी परत फॉर्म भरण्याची परवानगी दिली जाणार नाही.
- अर्जदार अनुसूचित जमातीमधील असणे आवश्यक आहे.
- अर्जदाराकडे तहसीलदार यांनी दिलेला जातीचा दाखला असणे आवश्यक आहे.
- अर्जदाराकडे तहसीलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला असणे आवश्यक आहे.
- महाराष्ट्र राज्याच्या बाहेरील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ दिला जाणार नाही.

## भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत नूतनीकरण धोरण

- विद्यार्थ्यांना मागील वर्षाची परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे.
- जर विद्यार्थी कोणत्याही वर्षात अपयशी ठरला तर त्याला त्या विशिष्ट वर्षासाठी शिष्यवृत्ती दिली जात नाही.
- शिष्यवृत्तीचे नूतनीकरण करण्यासाठी विद्यार्थ्याला ऑनलाईन अर्ज करावा लागेल.

## भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत आवश्यक कागदपत्रे

- अर्जदाराचे आधार कार्ड
- रहिवाशी दाखला
- नुतनीकरणासाठी मागील वर्षाची गुणपत्रिका
- सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेलो उत्पन्नाचे प्रमाणपत्र
- जात वैद्यता प्रमाणपत्र
- अर्जदाराचे रेशन कार्ड
- दहावी उत्तीर्ण गुणपत्रिका
- महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र
- जात प्रमाणपत्र

**वेबसाईट : https://mahadbt.maharashtra.gov.in**